दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी १५ डिसेंबर २०२४

# "गुकेश : बुद्धिबळातील जिद्दीचा शिखरावरचा प्रवास"

संपादकीय

**सिंगापूर येथे सुरू असलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या युवा बुद्धिबळपटू डी. गुकेशने गुरुवारी एक अभूतपूर्व विजय संपादित केला. त्याने चीनच्या विद्यमान जागतिक विजेत्या डिंग लिरेनच्या अभेद्य डावपेचांना हरवले. या लढतीत गुकेशने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना 14व्या आणि अखेरच्या डावात ही कामगिरी केली, जी बुद्धिबळप्रेमींसाठी गौरवाचा क्षण ठरला आहे.**


डोममराजू गुकेशचां जन्म: 29 मे 2006, चेन्नई, तमिळनाडू, भारत येथे झाला. डी. गुकेशच्या यशामागे त्याच्या आई-वडिलांचा मोठा वाटा आहे. त्यांचे वडील डॉ. राजिनीकांत हे ईएनटी स्पेशालिस्ट (कान, नाक, घसा तज्ज्ञ) आहेत, तर आई पद्मा या मायक्रोबायोलॉजिस्ट आहेत. वैद्यकीय क्षेत्रात व्यस्त असतानाही त्यांनी आपल्या मुलाच्या बुद्धिबळातील कौशल्याला ओळखून त्याला पूर्ण पाठिंबा दिला.

गुकेशच्या पालकांनी त्याला सुरुवातीपासून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण, स्पर्धांसाठी प्रवासाची सुविधा, आणि ताणमुक्त वातावरण दिलं. त्यांच्या प्रोत्साहनामुळे गुकेशने बुद्धिबळावर संपूर्ण लक्ष केंद्रित करून कमी वयात मोठे यश मिळवले. विशेषतः, डॉ. राजिनीकांत यांनी शिस्तबद्धता आणि एकाग्रता यांना महत्त्व दिलं, ज्यामुळे गुकेशला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करता आलं.

विशेष म्हणजे गुकेश हा भारताचा एक आघाडीचा युवा ग्रँडमास्तर (GM) आहे. तो 2019 मध्ये फक्त 12 वर्षे, 7 महिने, आणि 17 दिवसांचा असताना ग्रँडमास्तर बनला, ज्यामुळे तो त्या काळातील तिसऱ्या सर्वात तरुण ग्रँडमास्तर ठरला. विश्वनाथन आनंद यांच्या नंतर भारतीय बुद्धिबळाचा नवा चेहरा म्हणून त्याचं वर्णन केलं जातं. त्याने विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यामध्ये आशियाई बुद्धिबळ चॅम्पियनशिप आणि वर्ल्ड युथ चॅम्पियनशिप यांचा समावेश आहे

गुकेश सध्या जागतिक क्रमवारीत झपाट्याने पुढे जात असून, त्याला भारतीय बुद्धिबळाचा भविष्यकालीन आशास्थान मानले जात आहे. डी. गुकेशने बुद्धिबळातील आपले स्थान मिळवण्यासाठी कठोर मेहनत आणि शिस्तबद्ध सराव केला आहे. त्याचा दिवसाचा मोठा भाग बुद्धिबळाच्या सरावाला समर्पित असायचा.

गुकेश दररोज 7-8 तास बुद्धिबळ सराव करत असे. यामध्ये ऑनलाइन खेळणे, तांत्रिक डावपेच शिकणे,



आणि अलीकडच्या स्पर्धांतील डावांचा अभ्यास यांचा समावेश होता.त्याने भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन घेतले. विशिष्ट डावपेच आणि रणनीती सुधारण्यासाठी प्रशिक्षकांनी त्याला मदत केली. बुद्धिबळासाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवर खेळत त्याने जागतिक स्तरावरील खेळाडूंविरुद्ध सराव केला, ज्यामुळे त्याची स्पर्धात्मक मानसिकता तयार झाली. तो पूर्वीच्या जागतिक विजेत्यांचे डाव पाहून त्यातून शिकायचा. प्रत्येक डावपेचाचा सखोल अभ्यास करत स्वतःच्या खेळात सुधारणा केली. बुद्धिबळात दीर्घकाळ एकाग्रता आवश्यक असल्याने गुकेशने योगा, ध्यान, आणि हलक्या व्यायामाचा नियमित सराव केला.

गुकेशच्या आई-वडिलांनी त्याच्या वेळापत्रकाची काळजी घेतली आणि अभ्यास व बुद्धिबळ यामध्ये संतुलन राखण्यास मदत केली. स्पर्धांसाठी प्रवास आणि त्याचा मानसिक ताण कमी करण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले.

गुकेशचा प्रतिस्पेर्धी डिंग लिरेन यांचा जन्म 24 ऑक्टोबर 1992, वेंझू, झेजियांग, चीन येथे झाला. डिंग लिरेन हा चीनचा पहिला पुरुष जागतिक बुद्धिबळ विजेता आहे. 2023 मध्ये त्याने नेपोमनियाची (Ian Nepomniachtchi) ला हरवत जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद पटकावलं. डिंग हा चीनसाठी बुद्धिबळातील यशाचा नवा अध्याय ठरला आहे. तो 2800+ FIDE रेटिंग पार करणारा पहिला चीनी खेळाडू ठरला. लिरेनच्या शैलीची ओळख संयम, तांत्रिक कौशल्य, आणि अतिशय कठीण परिस्थितीत निर्णय घेण्याच्या क्षमतेसाठी केली जाते. त्याने 2009 आणि 2011 मध्ये आशियाई बुद्धिबळ चॅम्पियनशिपसह अनेक जागतिक पातळीवरील विजेतेपदे जिंकली आहेत.

गुकेश युवा आहे, जोशपूर्ण, आणि आक्रमक शैलीने खेळ करणारा आहे तर लिरेन: अनुभवी, तांत्रिकदृष्ट्या सखोल, आणि संयमाने खेळ करणाराआहे .दोघेही बुद्धिबळाच्या दोन पिढ्यांचं प्रतिनिधित्व करतात, आणि त्यांची लढत बुद्धिबळप्रेमींसाठी नेहमीच रोमांचक असते.

गुकेशने डिंग लिरेनच्या डावपेचांना समजून, सावध आणि ठाम रणनीती वापरली. काळ्या मोहऱ्यांनी खेळताना सुरुवातीला रक्षात्मक पवित्रा घेत, नंतर आक्रमक शैलीने प्रतिस्पर्ध्याला चकवलं. हा विजय तांत्रिक कौशल्य, संयम, आणि जिद्द यांचं मिश्रण होता.

डिंग लिरेन हा सध्याचा जागतिक बुद्धिबळ विजेता असून त्याने जागतिक स्तरावर आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली आहे. त्याच्यावर मिळवलेला हा विजय गुकेशच्या कारकिर्दीत मैलाचा दगड ठरला आहे. डिंगचा खेळ प्रामुख्याने त्याच्या संयमी आणि अभेद्य डावपेचांसाठी ओळखला जातो, परंतु गुकेशच्या कुशलतेसमोर तो झुकला.

गुकेशची ही कामगिरी भारतीय बुद्धिबळाच्या इतिहासात अजरामर ठरेल. त्याने जागतिक स्तरावर भारताचं नाव उंचावलं असून विश्वनाथन आनंद, विदित गुजराती, आणि प्रग्गनंधा यांच्या पंक्तीत स्थान मिळवलं आहे. केवळ 18 वर्षांच्या गुकेशने अतिशय प्रगल्भतेने खेळ सादर केला. त्याच्या कोचिंग टीमने त्याच्या डावपेचांवर सखोल काम केलं. विविध स्पर्धांमध्ये भाग घेतल्यामुळे गुकेशचा आत्मविश्वास वाढला आहे.

गुकेशच्या या विजयामुळे युवा बुद्धिबळपटूंना नवा आत्मविश्वास मिळाला आहे. जागतिक स्तरावर भारताला अजून दिग्गज खेळाडू घडवण्याची प्रेरणा मिळाली आहे.

गुकेशने मिळवलेला हा विजय फक्त एका खेळाचा भाग नसून तो भारतीय बुद्धिबळ क्षेत्राला मिळालेलं एक नवीन युग मानलं जात आहे. जागतिक स्तरावर भारताला मिळालेली ही ओळख भविष्यात देशाच्या अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा देईल, यात शंका नाही

ज्येष्ठ विधिज्ञ **श्रीनिवास घैसास** हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते **जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती** याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.

# कोकणातील वार्षिक जत्रोत्सव



## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९९९५५.

कोकण हा तसा सणासुदींच्या समृद्धीचा प्रांत. वर्षभरातील अनेक पारंपारिक सण कोकणात मोठ्या उत्साहात साजरे होतात. अशा प्रकारचे सणही कमी म्हणून की काय, कोकणात दरवर्षी देवदिवाळीनंतर वार्षिक जत्रोत्सवांना प्रारंभ होतो. पुर्वी कोकण हा भौगोलिक दृष्टीने अतिदुर्गम प्रांत होता. त्याच अर्थाने अनेक ठिकाणी कोकण प्रांताचा उल्लेख 'शापित भूमी' असा केलेला आढळतो. मात्र हा प्रांत दुर्गम असला तरी निसर्ग सौंदर्याने नटलेलाही आहे. त्यामुळेच कोकण प्रांतास 'धरतीवरचा स्वर्ग' असेही म्हटले जाते. कोकणातील माणूस हा देवावर असीम श्रद्धा ठेवणारा आहे. कोकणातील अनेक देवस्थाने स्वयंभु आहेत. प्रत्येक देवस्थानाची अशी एक खास आख्यायिका आहे. प्रत्येक ठिकाणचे काहीतरी खास असे 'गूढ' आहे. तद्वतच कोकणातील माणसाच्या मनाचाही पटकन थांग लागत नाही, त्याच्यातही काहीतरी गूढ आहे असे म्हटले जाते.

देवदिवाळीनंतरच्या काळात कोकणातील पारंपारिक कृषी उत्पादने स्थानिक बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होतात. साधारण वर्षभराची बेगमी करून उरलेले धान्य स्थानिक बाजारात विकले तर घरखर्चासाठी थोडेफार पैसे मिळतील ही माफक अपेक्षा यामागे असते. या काळात कोकणातील हवामान थंड असते. अनेक वेळेस थंडीचा कडाका वाढलेला असतो. खरीपाचे धान्य म्हणजे भात, नाचणी, कुळीथ, भुईमूग वगैरे पिके घरात आल्याने शेतकरी या दिवसांत निश्चिंत असतो. पुढील हंगामासाठीची मशागत करण्यासाठी पुढचे अनेक महिने पडलेले असल्याने या काळात येथील माणसे काहीशी निवांत असतात. शेतीमालाची विक्री, देवाणघेवाण व्हावी, स्थानिक कंदमुळे, भाजीपाल्यास बाजारपेठ मिळावी, शेतीच्या कामांतून बाहेर पडलेल्या लोकांना थोडा विरंगुळा मिळावा, मनोरंजन व्हावे आणि हे सारे करताना त्याला एक अध्यात्मिक अधिष्ठान असावे, या निमित्ताने आपल्या ग्रामदैवतांचा उत्सव साजरा व्हावा. गणगोत, पावणे-रावळे यावेत, भेटीगाठी व्हाव्यात आणि एकंदरीत माणसा माणसांमधला सुसंवाद वाढावा हा मुख्य हेतू डोळ्यांसमोर ठेवूनच पुर्वापार काळापासून अशी वार्षिक जत्रोत्सवांची प्रथा प्रचलीत झाली असावी.

दक्षिण कोकणात जवळपास प्रत्येक गावातील ग्रामदैवतांचे वार्षिक जत्रोत्सव याच काळात साजरे होतात. अनेक ठिकाणी वार्षिक जत्रोत्सवात पारंपारिक दशावताराचे आयोजन असते. दशावतार ही पारंपारिक सांस्कृतिक कला आजदेखील खास लोकाश्रय व आधार टिकवून आहे. दशावतार हा पारंपारिक नाटकाचा एक प्रकार आहे. मात्र कोणतीही लिखित संहिता नसताना केवळ नैसर्गिक अभिनय आणि आख्यायिकेचा आधार घेऊन दशावतार नाटक सादर होते.

दशावतार नाटकात स्त्रियांची भूमिकाही पुरुषच साकारतात. अनेक वेळेस अशा पुरुषांची वेशभूषा व रंगभूषा इतकी मिळतीजुळती असते की हा पुरुष नसून ही खरोखरची स्त्रीच असावी असे वाटते. याशिवाय नाटकातील प्रत्येक कलावंत आपली वेशभूषा, रंगभूषा वगैरे आपली आपण करतो. कोणत्याही बाबतीत त्याला दुसऱ्याचा आधार घ्यावा लागत नाही. कोणतेही नेपथ्य नसताना केवळ एका लाकडी बाकड्याच्या आधाराने हे नाटक सादर होते. हार्मोनियम वाजविणारा बुवा ढोलकी, झांज इतकीच संगीत साथ या नाटकासाठी पुरेशी ठरते.

नाटकाच्या सुरुवातीस गणपती स्तवन, आरती खास दशावतार पद्धतीने होते. त्यानंतर रसिकांना पोट धरून हसविणारा संकासूर येतो आणि त्यानंतर मुख्य नाटकास सुरुवात होते. दशावतार नाटक रात्री बारा वाजल्यापासून ते पहाटेपर्यंत किंवा अगदी सकाळपर्यंतही चालते. प्रत्येक गावात दशावतार नाटक आवर्जून बघणारा रसिकवर्ग आहे. याशिवाय जवळपासच्या गावांतील नाट्यरसिकही अशा नाटकांना गर्दी करतात. दक्षिण कोकणात अशा जत्रोत्सवांना 'दहीकाला' म्हणतात. दशावतार नाटक संपल्यावर तेथेच दहीकाल्याचा कार्यक्रमही साजरा होतो. अनेक ठिकाणी अशा जत्रोत्सवात ग्रामदैवतांचे तरंग बाहेर काढतात. गावातील दुसऱ्या मंदिरात असलेले हे तरंग वाजतगाजत जत्रोत्सव असलेल्या मंदिरात येतात. या तरंगांनाही अनेक ठिकाणी 'शीवकळा' म्हणतात. ह्या शीवकळा मंदिरात येऊन विसावल्यावरच मग दशावतार नाटकाला सुरुवात होते.

काही ठिकाणच्या वार्षिक जत्रोत्सवात मात्र दशावतार नाटक होत नाही. तेथे रात्रभर जत्रोत्सवच साजरा होतो. मात्र काही ठिकाणी यानिमित्त गोंधळ, मशाल उत्सव, 'दिंडेजत्रा' साजरी होते. जत्रोत्सवाच्या निमित्ताने गावातील अनेक माहेरवाशिणी देवीची ओटी भरण्यासाठी माहेरी येतात. जत्रेत हॉटेल्स, खेळणी, खाऊ, सौंदर्य प्रसाधने, मिठाई वगैरेंची अनेक दुकाने येतात. याशिवाय आले, कणग्या, करांदे, चिनी यांसारख्या कंदमुळांचीही खरेदी-विक्री होते.

(पान ८ वर)

## भाग २ - हयात नसलेली जिवंत माणसं

## गावाकडच्या आठवणी



भावेश लोंढे,
दापोली
मोबा. ९७६९३८६०९१

गावपण जपणारी साधी भोळी माणसं कुणाच्या ध्यानीमनी नसली तरी आपला निरागसपणा,आपला साधा स्वभाव सोडत नसतात. ती माणसं सुखात सर्वांच्या पाठीमागे आणि दुःखात सर्वांचे पुढे असतात.असा माझा कयास आहे. आपल्या आजा पंज्याची पिढी अशीच काहीशी माणुसकी जपणारी, नाते जपणारी, सुखदुःखात एकमेकांकडे धावून जाणारी, टचकन डोळ्यात पाणी येणारी होती आणि अजून काही जण या गावराहाटात त्यांचं वेगळपण जपून आहेत.त्यांच्या वेगळेपणामुळे अशी माणसं चटकन लक्षात येतात. गावाशी नाळ जपणारे असतात.त्यांना कितीही डीवचलं,मस्करी केली तरी त्यांचा स्वभाव बदलत नसतो.उलट ते आपल्याशी अजून घट्ट राहतात.आपली नीतिमत्ता,अडाणीपणा सोडत नाहीत ते केवळ आपल्या गावासाठी.आपल्या वाडीसाठी. नानापरीची माणसं आपल्या आसपास वावरून गेलेली असतात,पण आपल्याला त्याचा गंध नसतो.

तुकाराम मामा गावातील असाच एक मजुरी करून पोट भरणारा साधा माणूस.लोकांच्या नेहमी उपयोगी पडणारा.कुणाची मळणी असो.कुंपण बांधणे असो,बांध घालणे,फाटी फोडणे असो,कवल तोडणे असो व्वा आंबे,फणस उतरवणे असो.कधी कामाच्या बाबतीत "नाही" हा शब्द नव्हता.पडेल ते काम करणे हा त्यांचा ध्यास.वाडीतील गडी माणूस म्हणून फेमस.कुणाच्या उगीदुगीत नसणारा माणूस अर्धा दिवस पोटात दुखत राहते म्हणून दवाखान्यात घेऊन जाताना अर्ध्या रस्त्यातच अर्ध्यावरती सोडून निघून जातो.कसलीही मागे बाकी नाही.मग गणपतीत मेंडीकोट खेळताना बुजुर्ग मंडळींना एक भिडू कमी पडतो.तेव्हा मात्र डोळ्याच्या कडा ओलावल्या शिवाय राहत नाहीत.

भरणारा साधा माणूस.लोकांच्या नेहमी उपयोगी पडणारा.कुणाची मळणी असो.कुंपण बांधणे असो,बांध घालणे,फाटी फोडणे असो,कवल तोडणे असो व्वा आंबे,फणस उतरवणे असो.कधी कामाच्या बाबतीत "नाही" हा शब्द नव्हता.पडेल ते काम करणे हा त्यांचा ध्यास.वाडीतील गडी माणूस म्हणून फेमस.कुणाच्या



तुकाराम मामा गावातील असाच एक मजुरी करून पोट उगीदुगीत नसणारा माणूस अर्धा दिवस पोटात दुखत राहते म्हणून दवाखान्यात घेऊन जाताना अर्ध्या रस्त्यातच अर्ध्यावरती सोडून निघून जातो.कसलीही मागे बाकी नाही.मग गणपतीत मेंडीकोट खेळताना बुजुर्ग मंडळींना एक भिडू कमी पडतो.तेव्हा मात्र डोळ्याच्या कडा ओलावल्या शिवाय राहत नाहीत.

संध्याकाळ झाली की,
"बाय जराशा घासलेट दे गं,जरा साकार देतस" अशी विनवणी करीत सोनी वाडीतील घर घेत बसायची. आदबीने विचारपूस करायची .विरलेलं फाटकं पातळ काष्टा नेसलेली असायची. आली की थपकल मारून बसायची..वाडीतील पोरं ही तीला "सोनी सोनी" चिडवायची.तशी म्हणायची
"बायो हा बग ग पोर मला सोनी सोनी म्हणतोय,ओराड त्याला"
दिवसभर काय करायची, कुठे जायची कुणालाच माहीत नसायचं.घरीही तिच्या शिवाय कोणीच नाही.असाच एक दिवस सांगावा आला की,"सोनी गेली" नंतर वेगवेगळ्या आठवणींना उजाळा देण्यात काहीच अर्थ उरला नव्हता. घासलेटची वात कधीच विझली होती.जेव्हा देण्याची वेळ होती तेव्हा कुणीच दिले नाही.वातीला पुढं सारली नाही.ती आपोआप विझली.

मंजुळा.लग्नाच्या वयात आली नी तिला वेड लागले.कोण म्हणतं करणी केली तर कोणी म्हणतं येडपडच होती.तर ती वेडी होती की तिला वेड लावलं गेलं? हा प्रश्न मात्र आजपर्यंत अनुत्तरित आहे.एक चुणचुणीत मुलगी अभ्यासात हुशार नसली तरी खेळात पटाईत होती.मुलांना ही मागे टाकणारी.सातवी पूर्ण झाल्यावर मुंबईत गेली ती घरकाम करण्यासाठी. दहा बाय दहाच्या रूममध्ये भावाच्या खोलीवर राहत होती.घरकामाला लागली.काही दिवसाने रूमवर आली ती वेड घेऊनच.तिचाभाऊ,तिची वाहिनी या प्रकाराने घाबरून गेली.सरळ तिला गावाला आणून सोडली.गावाला तिची



(पान ८ वर )

# कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी-
भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.



## भाग - १

## जमीनहक्काची पूर्वपीठिका

**ज्येष्ठ विधिज्ञ श्रीनिवास घैसास हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.**

पुरातन काळापासून मानवाला जमिनीचे फार आकर्षण वाटत आले आहे. आज कितीही वैज्ञानिक क्रांती झाली तरीदेखील मानवापासून जमिनीला अलग करता येणे अशक्य आहे. म्हणूनच 'जमीन' ही एक मानवाच्या जीवनाशी अतूट नाते असणारी अशी गोष्ट आहे, ज्याच्यावर सारी मानवजातच काय, पण इतर सर्व सजीव सृष्टी गुजराण करते ते अन्नही भूमाताच निर्माण करते.

**जमिनीचा उपयोग आपण शेतीसाठी, घर बांधण्यासाठी, खेळासाठी, झाडे लावण्यासाठी आदी कित्येक कामांसाठी करत असतो. अशा जमिनीविषयी निरनिराळे कायदेकानून आहेत. निरनिराळी सरकारी दफ्तरे आहेत. या साऱ्याबद्दल सामान्य माणसाला प्राथमिक स्वरूपाची तरी माहिती असणे अत्यावश्यक आहे. म्हणून या पुस्तकात आपण जमिनीविषयीची सर्वसाधारण माहिती, त्यासंबंधीचे कागदपत्र कसे पाहावेत, जमिनीच्या खरेदीविक्रीचे व्यवहार कसे पार पाडावेत आदी सर्व प्रकारची माहिती पाहणार आहोत.**

अनादी कालात पृथ्वीवर जंगलेच जंगले होती. त्यामानाने मनुष्यवस्ती अगदीच कमी होती. त्यामुळे पूर्वी लोक टोळ्याटोळ्यांनी राहायचे आणि जंगले तोडून शेती करायचे. काही वर्षांनंतर तेथील जमिनीचा कस कमी झाल्यामुळे त्या जमिनीची उत्पादनक्षमता कमी झाली की ती जमीन ओसाड टाकून देऊन दुसऱ्या ठिकाणी जंगल तोडून शेती नव्याने सुरू करायचे. परंतु जसजशी मानवजात उत्क्रांत होत गेली तसतसे हे स्थलांतर कमी होऊन कालांतराने अजिबात थांबले. मानव एकाच ठिकाणी कायमस्वरूपी वस्ती करून राहू लागला. यातून गाव, खेडेगाव, वाड्या, आदींची निर्मिती होऊ लागली. या साऱ्यांचे अतिप्रगत स्वरूप म्हणजे आज वसलेली प्रचंड महाकाय अशी महानगरे/शहरे होत. यामुळेच जमीन म्हटली की त्यात अनेक प्रकार पाडता येतात आणि त्या प्रकाराप्रमाणेच त्यासंबंधीची माहिती घेणे योग्य ठरेल. म्हणून आपण जमिनीसंबंधीचे प्रमुख प्रकार पाहू या.

जमिनीचे उपयोगावरून मुख्य असे दोन प्रकार करता येतील ते म्हणजे

१) शेतजमीन,
२) बिनशेती जमीन.

**आता या प्रकारावरून प्रत्येक प्रकारच्या जमिनीची काळजी कशी घ्यावी याची माहिती आपण करून घेऊ या**

आता जेव्हा बिनशेती जमीन म्हणजे ज्याला इंग्रजीमध्ये आपण नॉन अॅग्रीकल्चरल लँड असे म्हणतो त्यासंबंधाने माहिती पाहताना त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या गोष्टींचीदेखील थोडीफार माहिती आपण या प्रकरणामध्ये करून घेणार आहोत.

जमिनीसंबंधीचे दप्तर खऱ्या अर्थाने ठेवण्यास ब्रिटिश काळाच्या दरम्यान सुरुवात झाली.

- आता त्याचे स्वरूप कसे आहे,
- त्यासंबंधी कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत,
- त्या अनुषंगाने कोणती काळजी घ्यायची,
- संबंधित गोष्टीमध्ये जर गफलत झाली असेल तर काय करायचे, त्यासंबंधी कुठला

मार्ग अनुसरायचा, आदी साऱ्या गोष्टींचा मागोवा आपण या प्रकरणात घेणार आहोत. म्हणूनच जमिनीच्या वापरावरून पडणाऱ्या प्रकारांपैकी शेतजमिनीच्या प्रकाराचा विचार आपण प्रथम करू या.

शेतजमीन

वर म्हटल्याप्रमाणे पूर्वीच्या काळी लोकसंख्या कमी आणि जमिनीची उपलब्धता जास्त असा प्रकार होता. त्या वेळी शेतजमिनीच्या दप्तराला (रेकॉर्ड) फारसे महत्त्व दिले जात नसे. तोंडी बोलून, बक्षीस देऊन, वतन देऊन, झाडे लावून आदींसारख्या असंख्य प्रकारांनी जमिनीचे हस्तांतरण होत असे आणि त्यासंबंधी फारसे लिखाण व दस्तऐवजदेखील केले जात नसत. परंतु जसजसे जमिनीचे महत्त्व वाढू लागले, जमिनीची उपलब्धता कमी होऊ लागली, जमिनीला सोन्याचा भाव येऊ लागला तसतसे त्यासंबंधीचे कायदेकानूनदेखील अधिक कडक होऊ लागले. याचा इतका अतिरेक झाला आहे की आज माणूस जमिनीच्या मालकी हक्कावरून एकमेकाचे मुडदेदेखील पाडू लागला आहे. अर्थात हा काही आपल्या पुस्तकाचा विषय नाही. त्यामुळे आपल्याला विषयांतर करायचे काही कारण नाही. म्हणूनच शेतजमिनीचे दप्तर कसे पाहावे, त्यामध्ये कशा प्रकारे बदल होतो, त्यासाठी काय काय करावे लागते ते आता आपण पाहू या. त्या अगोदर या दप्तराची निर्मिती कशी झाली ते **पुढील भागात पाहू या.**

**( क्रमश :)**

# चंदेरी दुनिया



श्री.श्रीराम शेटये.
नालासोपारा

## दामुअण्णा मालवणकर

एका चित्रपट अभिनेत्यासाठी त्याचा चेहरा देखणा व व्यक्तिमत्व रूबाबदार असणे खुप महत्वाचे असते. तो साजेसा असणे किंवा काही व्यंग असणे हे कलाकारासाठी संधी न मिळण्याचे प्रमुख कारण असू शकते. परंतू काही कलाकार आपले व्यंग हिच संधी समजून आपली गुणवत्ता सिध्द करतात. अशा कलाकारांमध्ये हिंदी नाटक आणि चित्रपट अभिनेते ओम पूरी, मराठी अभिनेत्री ललिता पवार, अभिनेते मधू आपटे अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यापैकींच दामूअण्णा मालवणकर हे मराठी नाट्य आणि चित्रपटाच्या ईतिहासातील एक असामान्य व्यक्तिमत्व होते. तिरळा डोळा असलेल्या दामूअणांनी आपले व्यंग हेच आपले वरदान असे मानून लहानपणापासूनच अभिनेते बनण्याची महत्वाकांक्षा मनी बाळगली. नूसती महत्वाकांक्षा न ठेवता त्यासाठी घरदार सोडून स्व:ताला रंगभूमीवर झोकून दिले. सुस्पष्ट शब्दफेक करण्याची एक वेगळी लकब आपल्या तिरळ्या डोळ्यामुळे विनोद निर्माण होईल याची प्रचंड दक्षता घेत नाटकातील एकेक पात्र जिवंत करण्याची विलक्षण उमेद त्यांना एका उच्च स्तरावर घेऊन गेली. त्यांनी साकार केलेले प्रत्येक पात्र हे परकाया प्रवेशा सारखे जिवंत वाटू लागले. आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे दामुअण्णा प्रेक्षकांच्या समोर दिसले रे दिसले की आपोआपच विनोद निर्माण होत असे.

मराठी रंगभूमी ही खर तर चित्रपटांची जननी आहे. मराठी नाटकातूनच कलाकारांच्या अभिनयाचा कस लागतो. पुर्वीच्या काळी अनेक नाटकंपन्या होत्या. या कंपनीत काम करणारे कलाकार, संगीत साथ देणारी वाजंत्री मंडळी, सहाय्यक, मदतनीस, नेपथ्यकार अशी सगळी मंडळी एका कुटूंबा सारखे रहात असत. त्यालाच नाटकाचे बिर्हाड म्हणत असत. हि सगळी मंडळी गावोगावी दौऱ्यावर जात असत. तिकडेच जेवन वैगरे बनवले जाई व मुक्कामी राहून नाटकाचे प्रयोग केले जात असत. बालगंधर्वांची नाटक कंपनी अशा प्रकारे गावोगावी फिरत असे. अनेक नाटक कंपन्यातून चंद्रकात गोखले, दामुअण्णा मालवणकर, बालगंधर्व, राजा गोसावी यांच्यासारखे गाजलेले नट बिऱ्हाडी रहात असत. या बिर्हाडी रहाण्याची मजासुद्धा काही औरच होती

नाटक आणि चित्रपट या दोन्ही माध्यमात विनोदी अभिनेते दामूअण्णा यांनी विशिष्ट प्रकारे हसण्याची लकब, तिरळा डोळा आणि प्रभावी शब्दफेक याद्वारे आपले विशिष्ट स्थान निर्माण केले होते. दामूअण्णा बापूशेठ मालवणकर यांचा जन्म निपाणी येथे झाला. त्यांच्या वडिलांचा सोनारकामाचा पिढीजात व्यवसाय होता. त्यामुळे दामूअण्णांनी त्यातच लक्ष घालावे अशी त्यांचे वडील बापूशेठ यांची अपेक्षा होती. पण त्यांना लहानपणापासूनच नाटकांचे वेड होते. घरातून या नाटकवेडाला विरोधच होता. त्यामुळे दामूअण्णा चोरून नाटके पाहत असत.तारुण्यात नाटकांच्याजाण्याचा प्रयत्न ध्यासामुळे त्यांनी घरातून पळून जाऊन महाराष्ट्र कंपनीत जाण्याचा प्रयत्न केला. मात्र वडिलांनी त्यांना परत आणून सोनारकामात लक्ष घालण्यास भाग पाडले. मात्र १९१३ साली ते पुन्हा एकदा घरातून बाहेर पडले आणि सांगलीला चित्ताकर्षक मंडळीत गेले. तिथे त्यांना बिनपगारी नोकरी मिळाली. चित्ताकर्षक कंपनीत दामूअण्णांना नाटकांच्या जाहिरातींचे फलक ढकलगाडीवर घालून रस्त्यावरून फिरवून आणण्याचे काम दिले गेले. पडतील ती कामे करण्यात त्यांचा वेळ जात असे. काही काळानंतर चित्ताकर्षक मंडळीच्या 'त्राटिका' या नाटकात दामूअण्णांना शिंप्याची भूमिका दिली गेली. ती भूमिका अगदी छोटी होती, मात्र त्यामध्ये त्यांनी प्रेक्षकांना भरपूर हसवले. हे साल होते १९१५. पुढे १९१६ साली चित्ताकर्षक कंपनी बंद पडली आणि दामूअण्णा लोकमान्य नाटक मंडळीत गेले. तिथे त्यांनी मामा वरेरकर लिखित 'हाच मुलाचा बाप' या नाटकात डॉ. पशूची भूमिका अगदी तडफेने केली. त्यामुळे त्यांचा नावलौकिक होण्यास सुरुवात झाली.

१९१८ साली दामूअण्णा मालवणकर केशवराव भोसले यांच्या ललितकलादर्श मंडळीत गेले. तेथे त्यांना काम मिळाले नाही, तेव्हा ते दीनानाथ मंगेशकरांच्या बलवंत नाटक मंडळीत गेले. त्या कंपनीत त्यांनी 'पुण्यप्रभाव', 'मृच्छकटिक', 'भावबंधन', 'विद्याहरण', 'उग्रमंगल', 'सन्यस्त खड्ग', 'वेड्यांचा बाजार' वगैरे नाटकात भूमिका करून चांगलीच प्रसिद्धी मिळवली. पुढे १९३३-३४ साली बलवंत नाटक कंपनी बंद पडली आणि त्याचेच चित्रसंस्थेत रूपांतर झाले. त्यामुळे दामूअण्णा दीनानाथ मंगेशकरांकडेच राहिले. १९३४ साली आलेल्या 'कृष्णार्जुन युद्ध' या चित्रपटात त्यांना छोटीशी भूमिका देण्यात आली.

( पान ४ वर )

# ग्रहांकित रोग व आजार भाग-५

## अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

(मागील भागावरून पुढे..)

**मागील भागात आपण बुध आणि त्याच्याशी संबंधित आजार यांबाबत अल्पांशाने माहिती घेतली. पुढे आपण गुरू (बृहस्पती) या ग्रहासंदर्भात माहिती घेवुयात.**

सूर्यमालेतील गुरु हा आकारमानाने सूर्य वगळता इतर सर्व ग्रहांत अधिक विशाल आणि सर्वात अधिक वजनदार असणारा स्थूल स्वरूपाचा ग्रह आहे. गुरु पितवर्णाचा असून हेमंत ऋतूचा स्वामी त्याचप्रमाणे धनु व मीन या राशींचा स्वामी आहे. पुनर्वसु, विशाखा आणि पूर्वाभाद्रपदा ही नक्षत्रे गुरुच्या अंमलाखाली येतात. गुरुला उत्तर दिशेचा प्रतिनिधी मानले गेले आहे. पुराणात गुरूला महर्षी ' अंगीरा ' यांचा पुत्र मानले आहे. कर्दम ऋषींची सुकन्या ' श्रद्धा ' ही गुरुची माता आहे. वेद पुराणांनी गुरूला देवांचा मार्गदर्शक ' गुरु ' म्हणून संबोधले आहे. सूर्य मंडळातील इतर ग्रहांपेक्षा गुरूला, बलशाली, कोमल वृत्तीचा, ज्ञानदाता, शुभ ग्रह म्हणून मानले आहे.

गुरुचे पृथ्वीपासूनचे अंतर सुमारे ३६,७०,००,००० मैल इतके आहे तर सूर्यापासूनचे अंतर सुमारे ४८,३२,००० मैल इतके आहे. सूर्याभोवती एक प्रदक्षिणा करण्यास गुरूला बारा वर्षे लागतात. अर्थात सूर्याचे एका राशीत सुमारे एक वर्षभर भ्रमण असते. सूर्याच्या पृष्ठभागाचे तापमान सुमारे १३८० अंश सेंटीग्रेड असल्याचा उल्लेख आहे. गुरुवर सोडलेल्या ' व्हायकिंग ' या यानाने पाठवलेल्या छायाचित्रांनुसार गुरुवर पाणी, वारा यांच्या अस्तित्वाचे चिन्ह आढळले नाही. गुरुवर दाट वायूचे ढग असावेत किंवा ग्रुरू हा वायूचे बुडबुडे असणारा एक लाव्हा उफाळवणारा गोळा असावा असे वैज्ञानिकांचे मत आहे.

ज्योतिष शास्त्रात गुरूला सात्विकता, शारीरिक सुदृढता आणि ज्ञान यांचा कारक मानले गेले आहे. गुरु हा धर्म, न्याय, पारलौकिक सुख यांचा कारक आणि नीति-नियामक मानला गेला आहे. जन्म कुंडलीतील गुरुच्या स्थितीवरून व्यक्तीची विद्याध्ययनता, बुद्धीसंपन्नता, चरित्रता, सन्माननीयता, सुदृढता, व्यक्तीचे ऐश्वर्य, संपत्ती, संतती (विशेषतः पुत्रसंतती), पारलौकिक सौख्य, अध्यात्मज्ञान यांचा विचार फलादेशासाठी केला जातो. या सर्व बाबींमध्ये, गुरु जर कुंडलित शुभ स्थितीत असेल तर, जातकाला संपन्न करतो.

व्यक्तीच्या जन्मकुंडलीत गुरुची स्थिती प्रतिकूल किंवा दोषपूर्ण असेल तर व्यक्तीला सर्दी, पडसे यांचा त्रास होतो तसेच नाक, कान, गळा, घसा, फुफुसे यांच्यासंबंधित विकार किंवा रोग जडतात. गुरुच्या अशुभ प्रभावाने कफविकार, चरबी वाढणे अर्थात मेदजन्य विकार जडतात. मानवी शरीराच्या कमर ते जांघेपर्यंत गुरुचे प्रभावक्षेत्र असते. मूर्छा येणे, सूज येणे, हृदयरोग व क्षयरोग यांच्याशीही गुरुच्या इतर ग्रहांबरोबर अशुभत्वाचा संबंध येत असतो. गुरुच्या अशुभत्वाने संतती होण्यात बाधा अडचणी संभवतात. विशेषतः पुत्र संतती न होण्यात अनेकदा गुरुचे अशुभत्व कारणीभूत असल्याचे कुंडली अभ्यासातून अनुभवास येते. गुरुच्या अनुकूलतेने किंवा शुभ योगाने उत्तम बुद्धिमत्ता लाभते तर प्रतिकूलतेने किंवा अशुभ योगाने बुद्धिभ्रंशता, मंदबुद्धीत्व व्यक्तीस येते. व्यक्ती अधर्माकडे कलते. यथार्थ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ साधण्यात अपयशी ठरते. गुरुच्या अशुभत्वाने जीवनात ताण-तणाव, नैराश्य आल्याने व्यक्ती मानसिक आजारांना बळी पडते. आत्महत्या करण्यास प्रवृत्त होते. प्रापंचिक सौख्याबरोबरच पारलौकिक सौख्यालाही मुकते. गुरुचे शुभत्व उत्तम वैवाहिक सौख्य प्रदान करते तर अशुभत्व वैवाहिक सौख्य साधण्यात अडथळे आणते जणु दांपत्य सौख्यात कटू खडा पाडते.




घशाचे विकार, टायफॉइड, यकृताचे विकार, अतिसार, मुळव्याध, डोळे येणे, गलगंड, मानसिक चिडचिड किंवा क्षोभ हे विकारही गुरुच्या प्रतिकूल स्थितीतून व्यक्तीच्या वाट्याला येत असतात. गुरुचे राशींमधून गोचर भ्रमण होत असताना व्यक्तीच्या जन्मराशीपासून (जन्म कुंडलीत चंद्र ज्या राशीत असतो त्या राशीपासून) चौथ्या, आठव्या आणि बाराव्या राशीत गुरुचे भ्रमण असताना कित्येकदा व्यक्तीला पीडादायक ठरते. अशावेळी व्यक्तीची मानसिकता व आरोग्य यांवर विपरीत परिणाम दिसून येतात. अशावेळी तज्ञ ज्योतिष्यांकडून मार्गदर्शन घ्यावे, गुरुची उपासना करावी, गुरुची दाने करावित व तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने वैद्यकीय उपचारही साधावेत. नक्कीच दिलासा मिळतो असे अनुभव मला ज्योतिषीय व्यवसायातून आलेले आहेत.

**उर्वरित पुढील भागात..**

---

# दामुअण्णा मालवणकर

(पान ३ वरून)

चित्रपटातल्या त्यांच्या कामांची हीच सुरुवात होती. पुढे ३-४ वर्षात 'लक्ष्मीचे खेळ', 'सत्याचे प्रयोग', 'ठकीचे लग्न' वगैरे चित्रपटांत त्यांनी भूमिका केल्या.

त्यानंतर १९३८ साली ते कोल्हापूरला आले आणि त्यांनी मा. विनायक यांच्या 'ब्रह्मचारी' चित्रपटात आश्रम चालकाची भूमिका केली. या भूमिकेमुळे त्यांना चांगले नाव मिळाले. मा. विनायक यांच्या चित्रपटातच त्यांच्या अभिनयाला चांगला वाव मिळाला. विनोदी चित्रपटांचे नवे दालनच उभे करण्यात मा. विनायक यांना दामूअण्णा मालवणकरांनी मदत केली. १९३९ साली प्रदर्शित झालेल्या 'ब्रँडीची बाटली' या चित्रपटात त्यांनी नायकाची भूमिका साकारली. 'बगाराम'च्या भूमिकेत त्यांना आपल्या विनोदी अभिनयाला पूर्ण वाव देता आला आणि ही भूमिका लोकप्रिय झाली. त्यानंतर 'लग्न पहावं करून', 'सावकारी पाहुणे', 'गजाभाऊ' या चित्रपटांतूनही त्यांनी नायकाच्या भूमिका साकारल्या आणि आपल्या विनोदी अभिनयाचा प्रेक्षकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवला. त्यानंतर मा. विनायक यांच्याकडे 'माझं बाळ', 'चिमुकला संसार', 'अर्धांगी', 'अमृत', 'सुखाचा शोध', 'संगम', 'पहिली मंगळागौर' या मराठी चित्रपटांत, तसेच 'सुभद्रा', 'बडी माँ' या हिंदी चित्रपटात विविध भूमिका केल्या. मा.विनायक यांच्या प्रत्येक चित्रपटात त्यांच्यासाठी खास विनोदी भूमिका असायचीच.

१९४७ साली मा. विनायक यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी 'चूल आणि मूल' या चित्रपटातून भूमिका केली. पुढे 'मोरूची मावशी' (१९४८), 'ब्रह्मघोटाळा' (१९४९), 'गळ्याची शपथ' (१९४९), 'बायको पाहिजे' (१९५०), 'देव पावला' (१९५०) या चित्रपटांत त्यांनी नायक म्हणून भूमिका केल्या आणि खऱ्या अर्थाने विनोदी अभिनेता म्हणून स्वत:चे आगळेवेगळे स्थान निर्माण केले. त्याशिवायही अनेक मराठी, हिंदी चित्रपटांतून त्यांनी महत्त्वाच्या भूमिका केल्या. सुरुवातीच्या काळात बिनपगारी, त्यानंतर दोन आणे रोजगारावर काम करत दामूअण्णा दोन हजार रुपये घेऊन भूमिका करीत असत.

चित्रपटातील लोकप्रियता शिगेला पोहोचली, तरीसुद्धा दामूअण्णांना नाटकाची आवड स्वस्थ बसू देत नव्हती. राजाराम नाटक मंडळीत गंगाधरपंत लोंढे दामूअण्णांना 'भावबंधन'मधल्या 'गोकुळ'च्या भूमिकेसाठी खास बोलावून घेत. त्या वेळी ते ३५० रुपये नाईटवर काम करत. १९४४ साली लोंढे यांचे निधन झाल्यावर दामूअण्णांनी 'प्रभाकर नाटक मंडळी' ही स्वत:ची संस्था सुरू केली आणि वीर माधव जोशी यांचे 'उधार-उसनवार' हे नाटक रंगमंचावर आणले. चित्रपटसृष्टीतले काम सांभाळून त्यांनी आठ वर्षे साऱ्या महाराष्ट्रभर नाटकांचे प्रयोग केले. १९५२ साली ही नाटक कंपनी बंद पडल्यावर दामूअण्णांनी चित्रपट याच आपल्या कार्यक्षेत्रावर पुन्हा भर दिला.

राम गणेश गडकरी यांचा 'तिंबूनाना', चिं.वि. जोशींचा 'चिमणराव' आणि ना.धों. ताम्हणकर यांचा 'दाजी धडपडे' हे तिन्ही मानसपुत्र साकार करत दामूअण्णांनी त्या व्यक्तिरेखांना अजरामर केले. त्यांनी जवळपास ७५ हिंदी-मराठी चित्रपटांतून व अंदाजे ५० नाटकांतून विनोदी भूमिका केल्या. वयाच्या ८३व्या वर्षी मुंबईत त्यांचे निधन झाले.

**मिनरल वॉटर प्लान्ट अॅण्ड ड्रिकींग वॉटर प्लान्ट सप्लायर्स**

**१) डी. एम. प्लान्ट: अॅक्वाप्यूरो इक्वीपमेन्टस प्रा. लि.**

**पत्ता : ४१६/४१७ जोगनी इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, बिल्डींग नं. ९,**

**व्ही. एन-पुरव रोड, चुनाभट्टी, मुंबई-४०००२२.**

**फोन : ०२२-२४०५२८१४/१५/१३/१६.**

**वेबसाईट : www.aquapurosystm.com**

**(मिनरल वॉटर आणि डी. एम. प्लान्ट यांचे सप्लायर्स आणि उत्पादक, पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर प्लान्ट, कंपलीट वॉटर ट्रिटमेंट प्लान्ट यांचे उत्पादक आणि सप्लायर्स)**

# सरकारी योजना/नोकरी

## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारीपदाच्या मोफत पूर्व प्रशिक्षणाची संधी

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (Service Selection Board) (SSB) या परीक्षेची पूर्वतयारी करुन घेण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येते.

**छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, येथे महाराष्ट्र शासनातर्फे युवक व युवतीसाठी 30 डिसेंबर 2024 ते 8 जानेवारी 2025 या कालावधीत एस.एस.बी.(SSB) कोर्स क्र. 60 आयोजित करण्यात येत आहे. या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना निशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.**

मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्यदलातील अधिकारी पदाच्या संधीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय मुंबई शहर येथे 24 डिसेंबर 2024 रोजी मुलाखतीस उपस्थित राहण्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी आवाहन केले आहे.

**मुलाखतीस Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवर एस.एस.बी.-60 कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरुन सोबत यावे.**

**एस.एस.बी. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावे.**

- **कम्बाईंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (CDSE-UPSC) अथवा**
- **नॅशनल डिफेंस अ‍ॅकेडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) पास झालेली असावी व**
- **त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे.**
- **एनसीसी 'C' सर्टिफिकेट 'A' किंवा 'B' ग्रेडमध्ये पास झालेले असावेत व**
- **एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी.**
- **टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.**
- **विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा**
- **एस.एस.बी. साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे.**

**अधिक माहितीसाठी -**

**प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा**
**ईमेल आय डी training.pctcnashik@gmail.com किंवा**
**दूरध्वनी क्र. 0253-2451032 किंवा**
**व्हॉट्स अ‍ॅप क्र. 9156073306**

**यावर प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा, असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मुंबई शहर यांनी केले आहे.**

## नवी मुंबईत महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन

राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून संघटित करून त्यांना वैयक्तिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विकसित करण्यासाठी ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्यावतीने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबविण्यात येते. याअंतर्गत महिलांना कौशल्य व उद्योगाभिमुख प्रशिक्षणे देण्यात येतात. या महिलांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ प्राप्त करून देण्यासाठी 'महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन – २०२४' चे आयोजन सिडको एक्झीबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे १४ ते २५ डिसेंबरपर्यंत करण्यात आले आहे.

उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून लाखो महिला सक्षम उद्योजिका म्हणून अनेक उत्पादनांची निर्मिती करत आहेत. त्यांनी तयार केलेली ही विविध उत्पादने देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवून त्यांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून दरवर्षी 'महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन' आयोजित केले जाते. आतापर्यंत मुंबई, नवी मुंबई, नागपूर या ठिकाणी 'महालक्ष्मी सरस' चे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाला दरवर्षी चांगला प्रतिसाद नागरिकांकडून मिळतो.

'महालक्ष्मी सरस' चे नवी मुंबईतील हे दुसरे वर्ष आहे. या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्रातील सुमारे ३७५, इतर राज्यातून सुमारे १०० असे स्टॉल असणार आहेत. तसेच खमंग आणि रुचकर शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थांचे ७५ स्टॉलचे मिळून भव्य असे 'फूड कोर्ट' असणार आहे.

या प्रदर्शनात अनेक प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू, हातमागावर तयार केलेले कपडे, वुडन क्राफ्ट, बंजारा आर्ट, वारली आर्टच्या वस्तू याशिवाय महिलांच्या आकर्षणाच्या अनेक प्रकारच्या ज्वेलरी, लहान मुलांसाठी लाकडी खेळणी व इतर राज्यातील दुर्मिळ वस्तूंची रेलचेल असणार आहे. या प्रदर्शनातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन शहरी नागरिकांना होणार आहे. राज्याच्या सर्व भागाची चव एकाच ठिकाणी भेट देणाऱ्यांना अनुभवता येणार आहे. सहकुटुंब भेट देणाऱ्या कुटुंबांचा विचार करून लहान मुलांना खेळवाडी (प्ले एरिया) उभारण्यात आला आहे. यावेळी या प्रदर्शनात अनुभव केंद्र असणार आहे.

नवी मुंबई परिसरात सुद्धा महालक्ष्मी सरस प्रदर्शनाची परंपरा निर्माण व्हावी या हेतूने सलग दुसऱ्या वर्षी वाशी येथे हे भव्य प्रदर्शन आयोजीत करण्यात आले आहे. या प्रदर्शनातून मोठ्या प्रमाणात विक्री होऊन ग्रामीण महिलांच्या कर्तृत्वाला व उद्योग व्यवसायाला हातभार लावण्यास मदत होईल त्यामुळे या प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी असे आवाहन उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रुचेश जयवंशी यांनी केले आहे.




**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# अनिल जाधव कला सामाजिक कार्यात अग्रेसर असणारा कलावंत



अनिल जाधव

चिकाटी ,जिद्द, परिश्रम आणि अभ्यासपूर्ण बोलण समोरच्या व्यक्तीचा आदर करण हे गुण वैशिष्ट्ये असणारं व्यक्तिमत्व. म्हणजे माझे मित्र प्रख्यात गायक, सामाजिक कार्यकर्ता अनिल गुणाजी जाधव, रत्नागिरी जिल्हातील दापोली तालुक्यातील खेर्डी हे त्यांचं गावं,समाजाचं प्रबोधन मनोरंजन करण्यांत कुठं कमी न पडणारा प्रेक्षकांना नक्की काय आवडतं यांची उत्तम जाणं असणारा कलावंत.

त्यांच प्राथमिक शिक्षण गावात , माध्यमिक शिक्षण श्री शिवाजी हायस्कूल करंजाणी ता दापोली येथे झाले. हायस्कूल मध्यें शिक्षण घेत असताना त्यांची ओळख दिपक जाधव व सुर्यकांत जाधव या बंधु बरोबर झाली.हे दोन्हीही बंधू कलावंत होते.दिपक जाधव गायक आणि सुर्यकांत ढोलक वादन करायचे. 6 डिसेंबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दापोलीत तमाम भिमसैनिक बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येत असत .दिपक जाधव यांना त्यांच्या बंधूची संगिताची साथ बघून त्यांच्या या कलागुणांचा विद्यार्थ्यांदशेत अनिलजीवर प्रभाव पडला.घरात कोणच गायक वादक नसताना कला आत्मसात करणे कठीण होते. चुलत भाऊ दयानंद जाधव गायकी , बेंजो वादन करायचे.त्यांचे पाहून बेंजो वाजविण्यास शिकले .

प्रकाश धोत्रे यांच्या लाकडी बेंजोवर बेंजो वाजविण्यात तरबेज झाले . अनीलजींनी बॅजो पार्टी ओपन केली .एप्रिल मे महीना गावोगावी कार्यक्रमासाठी बॅजो पार्टी घेऊन जात . 1990 मध्ये सुधिर सिन्हा प्रस्तुत कलाकारऑर्केस्ट्रा दापोलीत आला होता. मित्रासोबत ऑर्केस्ट्रा पहावयास गेले.प्रेक्षक मधून कोण गाणार का असं विचारले .त्या वेळेस धाडस करून स्टेजवरून जावून महाराष्ट्राचे प्रख्यात गायक आनंदजी शिंदे यांनी गायलेलं !! अहो राती या अंटीची जवा घंटी मी वाजवली !! गीत सादर केलं या लोकगीताला तेव्हा रसिकांनी भरपूर प्रतिसाद दिला .काहीनी बक्षीसे दिले.तिथ पासून खऱ्या अर्थाने गायनास सुरूवात झाली.

कवीगायक अजय घाडगे हे नातेवाईक असल्यामुळे त्यांनी काही गाणी दिली. नंतर बोंडीवली गावचे सुपुत्र व कवि गायक अरविंदजी रूके यांच्याकडे गाणं शिकावयास जाऊ लागले . गाण कसं गायचं तसेच हार्मोनियम कसा वाजवायचा याचं मार्गदर्शन त्यांनीं केले .त्यांच्याच गावचे महाराष्ट्राचे थोर कवी गोपिचंद रूके यांच्या महाराष्ट्रात अनेक शाखा होत्या त्यांचे गायक जनार्दन धोत्रे या दोघांचा सत्कार जाधव यांच्या गावच्या विहारात आयोजित केला होता..अरविंद रूके यांनी प्रोत्साहन दिले .म्हणाले तु आता गावू शकशील. पहिला कव्वालीचा सामना गायक चंद्रमणी महाडीक यांच्या बरोबर झाला.त्या वेळेस अगदीच पोरकट व समोर एक मोठा गायक .साथीदारानी चांगली साथ दिली प्रथमच तो कार्यक्रम यशस्वी केला.महाडिक गुरूजींनी सांभाळून घेतले. मिलिंद घाडगे बरोबर दुसरा सामना झाला. दिपक जाधव महेन्द्र मोरे सोबत सतत कार्यक्रम होत .

बौद्धजन सेवा संघ दापोलीने तालुक्यातील जंयतीचा पहिला कार्यक्रम महाराष्ट्राची आघाडीची गायिका नंदा नांद्रेकर यांच्याबरोबर आझाद मैदान दापोली येथे झाला. पाच हजार प्रेक्षक होते.पण तो कार्यक्रम यशस्वी केला त्या वेळेस दापोलीतील नामवंत कलाकार जसे चंद्रमणी महाडीक अरविंद रूके विजय जाधव दिपक जाधव गौतम जाधव दापोली मंडणगड खेड येथील कलाकार यानी प्रशंसा केली. भाऊ मोहिते यांच्या निवृत्तीनंतर त्यांच्या सत्काराचा कार्यक्रमात बौद्धजन सेवा संघाने प्रथमच शिंदेशाहीतील गायिका कविता शिंदे यांच्या सोबत आयोजीत केला. सात आठ हजार माणसे होती. कार्यक्रम जबरदस्त केला .त्या नंतर थांबलेच नाही. अनेक गाव तालुके वस्ती वाड्यात गायनाचे कार्यक्रम करू लागले.त्यांच्या जोडीला नंदा नांद्रेकर,कविता शिंदे, दिपाली शिंदे,अष्टशिला शिंदे,सुहासिनी शिंदे,कविता विद्यागर,शालीनी गवई मैना कोकाटे ,आशा धांदे,शालिनी शिंदे सत्यभामा म्हस्के व आजच्याही तेजल जाधव तेजस्विनी कांबळे सरीता कांबळे गायक विजय जाधव दिपक जाधव गौतम जाधव महेंद्र मोरे जगदिश तांबे अशा असंख्य कलावंता बरोबर असंख्य कार्यक्रम झालेले आहेत.आजही होत आहेत.

सन 2015 साली पोलादपूर कापडे या गावी विहाराचे उद्घाटन कार्यक्रमाला जाणार त्याच दिवशी त्यांच्या वडीलांची अचानक तब्बेत बिघडली, त्याचं दिवशी वडिलांचं आकस्मिक निधन झालं .मोठा प्रसंग कुटूंबावर ओढवला.काय करावे समजत नव्हते.अनीलाचा आज कार्यक्रम आहे हे लोकाना माहित होते.रात्री अकरा वाजता त्यांच्या वडीलांचा अंत्यविधी झाला. सर्व घरी आले.पोलादपूर येथून फोन येत होते .त्या वेळेस मोठे बंधू राहूल जाधव म्हणाले आपले वडील, आपण चळवळीतील माणसे आहोत.जे झालं आहे ते झालं पण अनिल तू कार्यक्रमाला जा. एकीकडे वडिलांची चिता पेटत होती , डोळ्यात अश्रू होते मनच तयार होत नव्हतं सर्व पाहुणे पत्नी नातेवाईक या सर्वानी धीर दिला. जन्मदात्या पित्यास दफन करून कर्म दात्याच्या जयंतीला रात्री पावणे एक वाजता पोहचले. लोकानी , आयोजक कार्यकर्ते यांनी सांत्वन केले .स्वतः च दुःख विसरुन कार्यक्रम केला. ही आठवण सांगताना ते गहिवरतात. कलावंत असा असावा.स्वतःच दुःख लपवून रसिकांची सेवा करणारा. अनिलजींचा पहिला कार्यक्रम कापसाल चिपळूण तेथे ऐकला, समक्ष भेटून अभिनंदन केले, छान गाता, गाते रहो म्हणालो. काही वर्षापूर्वी रत्नागिरीत जयंतीनिमित्त माझा ठरला होता पण अचानक तब्येत बिघडली मी अनिलजीना फोन केला. म्हटलं अनिलजी मी आजारी आहे तुम्हाला काहीही करून आज रत्नागिरीत माझ्या ऐवजी कार्यक्रमला जावं लागेल.माझ्या शब्दाचा मान राखून माझ्या अचानक जावून त्यांनीं कार्यक्रम यशस्वी केला.

अनिल जाधव यांनी अनेक शो केलेले असून त्याना माणणारा एक प्रेक्षक वर्ग आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया या पक्षात पूर्वी पासून कार्यरत आहेत .आंबेडकर चळवळीतील एक कलावंत म्हणून नावलौकिक मिळवला आहे. ग्रामपंचायत सदस्य ते सरपंच तसेच नगरपंचायत सदस्य अशी त्यांची राजकीय वाटचाल आहे पणं कला क्षेत्रातही कार्यरत आहेत. भिमक्रांती सांस्कृतिक कलामंच दापोली या नावाने कलावंत बांधवासाठी संस्था ऊभी केली आहे.या संस्थेच्या माध्यमातून कोरोना काळात कलावंताना मदतीचा हात दिला.

त्यांची दोन्ही मुले वकीली व्यवसाय करीत आहेत. असं त्यांनीं मला सांगितलं तेव्हां खूप आनंद झाला. कवी अरविंद रुके सोबत रविंद्र धोत्रे यांची गीते ते गाऊ लागले.

**"माझ्या भरताराच, बाय बॅरिस्टराच**
**कौतुक मावेना पोटात**
**किती देखणा दिसतोय साहेब माझा सुटबुट कोटात "**

त्यांनीं स्वतः लिहिलेले

**"लेकरे तुमची अनाथ झालीं, दुखाने झालीं बावरी**
**रडती चैत्यभूमीच्या तीरी "**

त्यांची लोकगीतं भन्नाट असतात . त्याचं गाणं लहानथोरांना आवडतं, माझ्यासह ते विजय जाधव शाहिर खेरटकर, कवी गायक अशोक महाडिक आणि इतर कवी गायक यांचा आदर करतात. कलावंत लोकप्रतिनिधी होऊन गायन बरोबरच लोकांची सेवा करून विकास कामात पुढाकार घेतो हेच त्यांचं कार्य मला उल्लेखनीय वाटतं,त्यांच्या कुटुंबाच्या प्रोत्साहनामुळे त्यांची कला सामाजिक कार्यात यशस्वी वाटचाल सुरू आहे.त्यांच्या योग्य पद्धतीनं सुरू असलेल्या कला सामाजिक कार्यास शुभेच्छा!

## खाद्य पदार्थ विकताना ग्राहकांच्या भावनाही जपायला हव्यात !




जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
संपर्क : ९६६४५५९७८०*

कल्याण येथील 'गुड फ्लिपिन बर्गर्स' या बर्गर्स विकणाऱ्या दुकानातील एक व्हिडीओ सध्या सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. तेथील एका बर्गर प्रकारामध्ये म्हशीच्या मांसाचा वापर करण्यात येत होता आणि त्याबाबत ग्राहकांना कोणतीच सूचना दिली जात नव्हती तसेच दुकानात किंवा मेन्यू कार्डात तसे स्पष्ट नमूदही केले गेले नसल्याचे एका हिंदु ग्राहकाने तेथील ग्राहकांच्या लक्षात आणून दिले आहे.

'हिंदू म्हशीचे मांस खात नाहीत. त्यामुळे 'बर्गर'मध्ये म्हशीचे मांस वापरायचे असेल, तर त्याविषयी ग्राहकांना माहिती द्यायला हवी', असे या हिंदु ग्राहकाने दुकानातील कर्मचाऱ्यांना सुनावल्याचे या व्हायरल झालेल्या व्हिडिओत दिसत आहे.

कल्याण वायलेनगर येथील 'गुड फ्लिपिन बर्गर्स' या दुकानात एक हिंदु ग्राहक पत्नीसमवेत गेला असतांना त्याने 'बर्गर' मागितला. बर्गरमधील मांसाविषयी शंका आल्यावर त्याने दुकानातील कर्मचाऱ्यांना 'बर्गर'मध्ये कोणत्या प्राण्याचे मांस आहे ?', अशी विचारणा केली. त्यावर कर्मचाऱ्याने बर्गरमध्ये म्हशीचे मांस असल्याचे सांगितले. त्यावर त्या हिंदु ग्राहकाने बर्गरची केलेली मागणी रद्द केली. त्यावेळी दुकानामध्ये अन्यही काही ग्राहक 'बर्गर' खात होते मात्र 'बर्गर'मध्ये म्हशीचे मांस असल्याचे कळताच तेथे बसलेले सर्व ग्राहक उठून गेल्याचे व्हिडिओत दिसत आहे. काही हिंदु ग्राहकांनी त्यांनी दिलेली 'बर्गर'ची मागणी रद्द करून पैसे परत घेतले.

मांस असलेले बर्गर खाण्यात हल्लीच्या तरुणाईला अधिक रुची असल्याने मांस असलेले बर्गर जवळपास सर्वच बर्गर्सच्या दुकानात उपलब्ध असतात; मात्र अशा बर्गर्समध्ये साधारणतः कोंबडीचे मांस वापरले जात .' असल्याचा समज असल्याने आपण घेत असलेल्या बर्गरमध्ये कोणाचे मांस वापरले आहे याबाबत कोणताही ग्राहक दुकानदाराकडे कधी चौकशी करत नाही, 'गुड फ्लिपिन बर्गर्स'ची मुंबई आणि परिसरात एकूण २४ दुकाने आहेत. देहली, पुणे, बेंगळुरू या ठिकाणीही त्यांची दुकाने आहेत. 'गुड फ्लिपिन बर्गर्स'मध्ये सुद्धा कोंबडीचेच मांस असते असे गृहीत धरून आजतागायत ग्राहक या ठिकाणचे बर्गर्स चवीने खात होते; मात्र जेव्हा सत्य लक्षात आले तेव्हा अनेकांची तळपायाची आग मस्तकात गेली आहे.



'गुड फ्लिपिन बर्गर्स'ची बहुतांश दुकाने ही हिंदुबहुल भागात वसलेली आहेत. हिंदू म्हशीचे मांस खात नाहीत मग म्हशीचे मांस असलेले बर्गर्स नक्की कोणाच्या जिभेचे चोचले पुरवण्याकरिता वापरले जाते असाही प्रश्न यानिमित्ताने विचारला जात आहे. हिंदू ग्राहकाने मीट बर्गरची मागणी केली असता ग्राहक हिंदू आहे हे लक्षात आल्यावर त्याला दिल्या जाणाऱ्या बर्गरमध्ये म्हशीच्या मासाचा वापर केला जात असल्याचे ग्राहकाला सांगण्यातही येत नव्हते किंवा मेन्यू कार्डात तसे स्पष्ट नमूदही करण्यात आले नव्हते. आजतागायत कितीतरी हिंदू ग्राहकांनी या ठिकाणचे म्हशीचे मांस घातलेले बर्गर्स खाल्ले असतील. हिंदू ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना अंधारात ठेवून म्हशीचे मांस असलेले बर्गर्स खायला देणे ही केवळ फसवणूक नसून त्यांच्या धार्मिक भावनांचाही अनादर आहे. आजमितीला मॅकडोनाल्ड, केएफसी, बर्गर किंग अशा कितीतरी खाद्य कंपन्या आपल्या आउटलेट्समधून मांसाहारी बर्गर्सची विक्री करतात. मांसाहारी बर्गरमध्ये कोंबडीचे मांस आहे असे समजून ग्राहक डोळे बंद करून या ठिकाणचे मांसाहारी बर्गर चवीने खातात; मात्र 'गुड फ्लिपिन बर्गर्स'मध्ये घडलेल्या घटनेवरून ग्राहकांनी जागृत व्हायला हवे. आपण खरेदी करत असलेल्या मांसाहारी बर्गरमध्ये कोणाचे मांस वापरले आहे हे ठणकावून विचारले पाहिजे. गाय किंवा म्हशीचे मांस असलेले खाद्यपदार्थ त्याठिकाणी विकले जात नाहीत ना याबाबत खात्री करून घ्यायला हवी.

हिंदुबहुल भागात असलेल्या अशा दुकानांमध्ये गाय किंवा म्हशीच्या मांसाचे कोणतेही पदार्थ आमच्याकडे विकले जात नाहीत अशा प्रकारचा फलक दर्शनी भागात लावण्यास प्रवृत्त करायला हवे, त्याशिवाय या कंपन्या वठणीवर येणार नाहीत. भारतात बहुसंख्य हिंदू राहतात आणि हिंदूंना गाय पूजनीय असल्याने आम्ही भारतात बीफ बर्गर विकत नसल्याचे मॅकडॉनल्ड्स कंपनीने यापूर्वीच स्पष्ट केले आहे, मग 'गुड फ्लिपिन बर्गर्स'ने यातून अद्याप बोध का घेतलेला नाही.

खाद्य पदार्थ विकणाऱ्या कंपन्या, हॉटेल्स आणि रेस्टोरंट आपला खप वाढवण्यासाठी पदार्थ खमंग आणि स्वादिष्ट बनवण्याकरिता अधिक भर देतात; मात्र हे पदार्थ ग्राहकांच्या धार्मिक भावना आणि आरोग्य जपणारे असायला हवेत याकडे ही मंडळी केव्हा लक्ष देणार ?




## मावलेची जत्रा

### मालवणी बोली



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

उभ्या वरीसभर ज्या जत्रेची वाट बघत असतय ती मावलेची जत्रा आजपासून सुरु झाली. मावलेचा खरा नाव भगवतीदेवी. पण तिका सगळे मावलीच म्हणतत. मावली म्हणजे चिंदर गावचा ग्रामदैवत. मावलेची जत्रा म्हणजे जवळपासच्या दहा पंधरा गावांसाठी सणच असता. व्यापारी, दुकानदार, हॉटेलवाले, कणगे, आला, मिठाई, खाजा विकणारे, कासार, गोसावणी आधीपासूनच जत्रेत आपली जागा अडवून ठेवतत. दरवरसाक मार्गशीर्ष पौर्णिमेक ही जत्रा सुरु व्हता नि पाचव्या दिवशी लळीतान संपता. आधी मावलेचा स्थान वर डोंगरात व्हता असा म्हणतत. पण मग गावाच्या रक्षणासाठी ती गावात येवन वसली. मावलेचा आधीचा देऊळ मोठाच पण जुना व्हता. आता गेल्या काय वर्षांपूर्वीच मावलेचा नवीन मस्त देऊळ बांधल्यानीहा.

माहेरवासणी, पै- पावणे, चाकरमानी मावलेच्या जत्रेक हजेरी लावतत. जत्रेदिवशी माणसांची ही! गर्दी मावलेच्या देवळाकडे जमता. पारकरांच्या हॉटेलापासून ती अगदी घुमड्यांच्या हॉटेलापर्यंत ही लांबलचक जत्रा भरता. एका दिसात लाखो रुपयांची उलाढाल करणारी मावलेची जत्रा अनेक कुटुंबांचा वर्षभराचा गणित एका दिवसात सोडवता. ही जत्रा पुर्वी आला, कणगे, मुळ्याची भाजी, घोपळे अशा साठी लय फेमस व्हती. अनेकजण वर्षभरासाठी लागणारा आला याच जत्रेत खरेदी करायचे. आल्याचे वाटे किंवा आला किलोवर विकत मिळायचा. चिंदरच्या मावलेच्या जत्रेक जावन कोणी आला आणि कणगे विकत घेतल्यान नाय असो कोण सापडायचोच नाय. तसाच मालवणी खाजा. जत्रेक गेलो आणि मालवणी खाजा न घेता इलो असो कोण गावात काय ओ?

जत्रेच्या निमतान आम्ही जुने मैत्रिणी दरवरसाक याच ठिकाणी भेटतव. गप्पा मारतव, तुझा गो कसा, माझा गो कसा करतव. जत्रेत फिरतव, भजी खातव. ही मावलेची जत्रा ऐन थंडीच्या कडाक्यातच येता. जत्रेक जातना, येतना ही! थंडी. पण जत्रेत मात्र माणसांच्या गर्दीत थंडी गायब व्हता. जत्रेदिवशी खास



सजवलेला मावलेचा रुप मस्त मोहक व सुंदर दिसता. इतर दिवशी केवळ पाषाण रुपात दिसणारी देवी अशी वस्त्रालंकारांनी सजवल्यावर छान दिसता. मावली नवसाक पावता, आमच्या मुलाबाळांक संभाळता. आमचीच काय, संपूर्ण कोकणाचीच मावलेवर अपार श्रद्धा आसा असा म्हटला तरी चुकीचा ठराचा नाय.



# चिकन तवा फ्राय



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

आज आपण चिकन तवा फ्राय पाहूया आणि चाखूया

साहित्य :

- 500 ग्रॅम चिकन (मध्यम आकाराचे तुकडे)
- 2 चमचे तेल
- 1 मोठा कांदा (बारीक चिरलेला)
- 2 टोमॅटो (बारीक चिरलेले)
- 2 हिरव्या मिरच्या (बारीक चिरलेल्या)
- 1 चमचा आलं-लसूण पेस्ट
- 1 चमचा तिखट
- 1/2 चमचा हळद
- 1 चमचा धने पावडर
- 1 चमचा जिरे पावडर
- 1/2 चमचा गरम मसाला
- 1 चमचा कसूरी मेथी
- मीठ चवीनुसार
- कोथिंबीर सजावटीसाठी

कृती:

1. चिकन मॅरिनेट करा:
2. चिकनला आलं-लसूण पेस्ट, हळद, तिखट, धने पावडर, जिरे पावडर, आणि मीठ लावून 30 मिनिटे मॅरिनेट करा.
3. तेल गरम करा:
4. तव्यावर 2 चमचे तेल गरम करा आणि त्यात चिरलेला कांदा घालून सोनेरी होईपर्यंत परता.
5. टोमॅटो शिजवा:
6. कांदा झाल्यावर त्यात चिरलेले टोमॅटो आणि हिरव्या मिरच्या घाला. मिश्रण नरम आणि तेल सुटेपर्यंत शिजवा.
7. चिकन शिजवा:
8. मॅरिनेट केलेले चिकन तव्यावर घालून चांगले परता. 8-10 मिनिटे मध्यम आचेवर शिजवा.
9. मसाले घाला:
10. गरम मसाला आणि कसूरी मेथी घालून नीट हलवा. झाकण ठेवा आणि 10-12 मिनिटे चिकन शिजू द्या.
11. सजावट:
12. तव्यातील चिकन कोथिंबिरीने सजवा.
13. गरमागरम तवा फ्राय चिकन पराठा किंवा भातासोबत सर्व्ह करा.
14. अधिक तिखट किंवा हलकी चव हवी असल्यास मसाले प्रमाण बदलू शकता



# हयात नसलेली जिवंत माणसं

(पान २ वरून )

आई,चुलते,चुलती यांनी तिला अनेक डॉक्टर,बाबा,भगत असे सर्व उपाय बघितले. मधेमधे बरी व्हायची पुन्हा वेड्यागत. शेवटी या वेडेपणाला घरचे कंटाळून गेले. मध्यंतरी चांगली झाली. लग्न झाले. मुलगी झाली. पुन्हा तिचा वेडसरपणा तिला विसरला नव्हता. सासरचे ही वैतागले. शेवटी सोडचिठ्ठी घेऊन आईकडे कायमची आली ती वेडी म्हणूनच. नवरा,मुलगी,सासर,माहेर याचे तिला कसलेच भान नसायचे. ती आपल्याच विश्वात खोल खोल बुडत चालली होती. वेडी मंजुळा म्हणून.भावाने खूप प्रयत्न केले. पण कोणताच गुण कामी आला नाही. दिवसेंदिवस कुटुंब बेजार होत होत. एक दिवस तिनेच स्वतःला संपवून टाकले. कायमचे. वेडी मंजुळा म्हणून. आता घराच्या वळचणीने गेलो तरी अंगावर सर्रकन काटा आल्या शिवाय राहत नाही.

प्रत्येकाच्या गालावरून खरखरीत हात कधीना कधी फिरला असेलच. मग तो आजीचा किंवा आजोबांचा ही असू शकतो. त्या बालवयात आपल्याला जास्त कळत नसते.पण जेव्हा हा हात सोडून जातो तेव्हा त्याचे दुःख जास्त असते. आता मरण नैसर्गिक येत नसले तरी आपल्या बाप दादांना मरण ऐच्छिक आले. ही त्यांची पुण्याई म्हणा किंवा नैसर्गिक जगणं म्हणा. आई, आजीचं ही असच काहीसं. तिने नातवांना वाढवले. उतारवयात ही तिने सारी कामे केली. बघता बघता अंथरुणाला कधी खिळली समजले नाही. आजी जेवली का? आजी आली नाही का? असे अनेक प्रश्न आजी न दिसल्यावर आईला विचारत होतो. कधी पायंडीवर बसून पानसुपारी खाताना नजरेस पडायची. तर कधी कोपऱ्यात बसून आपली वाट पाहत बसायची. तो कोपरा मात्र आजी गेल्यावर रिता झाला होता. आजीविना घर सूनसून झाल होत. आता आजी बसायची त्या पायरीवर जास्वंदीचे फूल वाहून हात जोडले जातात. आजी नावाची गोधडी मात्र अजूनही विरली नाही. तिने विणलेले धागे अजूनही घट्ट आहेत जसेच्या तसे.

"उगवत्या सूर्याला नमस्कार करताना मावळत्या सूर्याला विसरू नये" असे म्हणतात याचे एकमेव उदाहरण म्हणजे सदू काका होता. उगवत्या सूर्याला नमस्कार करीत नव्हता, पण मावळत्या सूर्याला मात्र साष्टांग दंडवत घालायचा. दिवसभर रेशनिग दुकानात पावती बनवायचा.पावती बनवायचे काम इतक्या हात शिफातीने करायचा की कुणाला वाटायचेच नाही की हा पक्का बेवडा असेल म्हणून. कितीही प्यायला तरी कुणाला त्रास नसायचा.आपल्याच धुंदीत आणि कैफात असायचा. एकदा का संध्याकाळ झाली की जो वाटेत भेटेल त्याला झोपून नमस्कार घालायचा.घरी येईपर्यंत ही तालीम रंगायची. कोणीही आगापिछा नसलेला माणूस जेव्हा माणसातून निघून जातो तेव्हा मात्र समस्त गावाला दुःख वाटते. तेव्हा माणुसकी नावाची व्याख्या पुन्हा जिवंत होते हे मात्र खरे.

गावाच्या एसटी कॅन्टीनमधील बाकावर बसून तो नेहमी बिडी फुकत बसलेला असायचा.त्याची स्टाईल म्हणजे सेम टू सेम मिथून चक्रवर्ती. झुपकेदार केस,टोकदार नाक,गळ्यात मण्याच्या माळा, हातात कडा, हाफ पँट आणि पायात पेरागोन चप्पल. त्याच नाव ही योगायोगाने मिथुन होते. असा हा गावातील स्वभूषित हिरो. काम काय करायचा तर एखादा चाकरमनी किंवा गावातील एखादा ईसम तालुक्याहून बाजार करून आला असेल तर त्याची बोचकी पोहचविणे आणि त्याचा मोबदला घेणे. कधी सलूनमधे पाणी भरणे, तर कधी कॅन्टीनमधील चहा पोचविणे, या व्यतिरिक्त काहीच काम करायचा नाही. कुणाला त्रास नाही. टपोरीपणा नाही. साधं जीवन जगणारा माणूस. वय तीस पस्तीस दरम्यान. एक दिवस रानात गेला असता फिट येते आणि तिथेच त्याचे जीवन संपते. बाजूला विहीर असून सुध्दा शेवटच्या क्षणी पाणी पिता आले नाही याहून एखाद्या माणसाला मरण ते काय यावे.

आपलं कोसो मैल दूर एक माणूस गाव सोडून येतो. गावात नदीवरील पूल बांधणार म्हणून दोन वर्ष वास्तव्य करतो. गावाला आपलंसं करतो. त्याची गावाशी नाळ जुळते. पुलावर मुकादम म्हणून काम करणारा जाधव पुलाचे काम संपल्यावरही गावात राहतो. गावात मिसळून जातो. त्याची दहा-बारा वर्षाची गुड्डी नावाची बाहुली अचानक आजारी पडते. एका रात्रीत खेळ खल्लास होतो. बाहुली अजूनही निजली आहे. उठेल म्हणून हंबरडा फोडतो, पण सारे व्यर्थ ठरते. जाधव ही आयुष्यातून उठतो. लेकीच्या जाण्याने तो सावरलाच नाही. गाव सोडून कुठे गेला कुणालाच माहीत नाही. कदाचित लेकीच्या शोधात.

असे अनेक माणसे आपल्या आसपास असतात. त्यांचे आपल्याला काही देणे घेणे नसते.एखादी मनाला न पटणारी घटना घडली की तो माणूस हयात नसूनही जिवंत असल्याचा भास होतो. त्याच्या आठवणी कायम उजळत राहतात.

# कोकणातील वार्षिक जत्रोत्सव

( पान २ वरून )

लहान- मोठ्यांसाठी विविध मनोरंजक खेळ, पाळणी, फनीगेम्स, मनीगेम्स, लकी ड्रॉ, सोरट यांसारख्या खेळांचीही जत्रोत्सवात रेलचेल असते. संपूर्ण रात्रभर ते अगदी सकाळपर्यंत हा जत्रोत्सव साजरा होतो. काही ठिकाणचा वार्षिक जत्रोत्सव हा पाच दिवसांचा असतो. पाचव्या दिवशी 'लळीत' कार्यक्रमाने जत्रोत्सवाची सांगता होते.

शेतीभातीच्या कामांमधून थकलेल्या, दमल्या- भागल्या माणसांना असे वार्षिक जत्रोत्सव फार मोठी नवी उर्जा देतात कष्टकऱ्यांच्या आयुष्यात विरंगुळ्याचे चार क्षण देतात. या निमित्ताने स्थानिक शेतमालाची खरेदी विक्री होते. चार नव्या गोष्टी घरात येतात. अशा जत्रोत्सवाचा आनंद घेऊन ताजातवाना झालेला, ताज्या उर्जेची उभारी लाभलेला कोकणातील माणूस मग त्याच्या पुढील नित्यकर्मांकडे वळतो. कोकण प्रांतात दरवर्षी फार मोठी आर्थिक उलाढाल घडवून आणणारे असे पारंपारिक वार्षिक जत्रोत्सव म्हणजे कोकणच्या संस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे असेच म्हणावे लागेल.

# काव्यांगण

## आनंद

आनंदाचे रंग | आनंदे तरंग |
आनंदाच्या संग | आनंदच ||

आनंदाची वाणी | आनंदाच्या कानी |
आनंदाच्या मनी | आनंदच ||

आनंद गगनी | आनंदी धरणी |
आनंदाच्या क्षणी | आनंदच ||

आनंद उदरी | आनंद पदरी |
आनंदासमोरी | आनंदच ||

आनंदी सागर | आनंदी घागर |
आनंदाचे घर | आनंदच ||

आनंदीआनंद | आनंदाचा छंद |
आनंदात धुंद | आनंदच ||

आनंद द्यावाही | आनंद घ्यावाही |
आनंदी व्हावाही | आनंदच |

**राज भिंगारे**

## आनंद

आनंद म्हणजे हर्ष
हास्याचा जिथे स्पर्श..

सुखी जीवनाचे सार
आनंद त्याचा मोठा आधार..

दु:ख गेले की येणारा
सर्व फुलवून टाकणारा..

डोळ्यात अश्रू येतात
पण ते आनंदाश्रू असतात..

छोट्या गोष्टीत वाटून घ्या स्वानंद
दु:ख सारून आयुष्यात आणा आनंद....

**अश्विनी मंगेश परब ,**
**ठाकुर्ली- ठाणे**

## आनंद

आनंद आगळा
आनंद सगळा
पहाया सोहळा
विठ्ठल सजला

झाले गोळा सारे
वारकरी राजे
केवळ तयांना
ध्यान माऊलीचे

नांदली सर्वत्र
सुखे अलगद
आनंदले जीव
किती अगतिक

पाऊले चालली
सहज बेभान
तया नसे त्रास
वाढवती शान

कुठे हरवली
दु:खे वेडी वेडी
हसली नव्याने
जीवनाची गाणी

**स्वाती विष्णु नष्टे,**
**सातारा**

## गवसला आनंद

गवसला आनंद जेंव्हा,
मलाच मी शोधले...
ध्यानमग्न होऊनी,
अंतरंगात डोकावले...
विचारांना दिला थांबा,
मन विचारशून्य केले....
श्वास रोखून काही काळ,
चित्त शुद्ध केले....
सकारात्मक दृष्टीने,
जगाकडे पाहिले....
दु:खास दूर करून,
सुख अनुभवले...
स्वत:स घडविणे,
हेच ध्येय ठरविले...
मनाच्या वारूस,
विचारांचे लगाम घातले...
मग आनंदाचे डोही,
आनंद तरंग अनुभवले....

**संतोष पवार ,**
**सावंतवाडी**

## आज की ताजा खबर

सांब भोळा गाव आहे
पारध्यांना वाव आहे

राजद्वारी रोज पार्टी
बेवड्यांना भाव आहे

कामचोरी लाचखोरी
शासनाचा डाव आहे

योजनांच्या घोषणाही
लांडग्यांचा घाव आहे

पालिकांच्या या तिजोऱ्या
भामट्यांचा ठाव आहे

चालताना दक्ष व्हा रे
लूटणारा साव आहे

**सुदेश मालवणकर,**
**दापोली**

## आनंद

कोणाला खाण्यात
कोणाला खिलविण्यात
कोणाला खेळण्यात
कोणाला खेळवण्यात
आनंदच आनंद जीवनात!

कोणाला जपात
कोणाला तपात
कोणाला संतापात
कोणाला शांततेत
आनंदच आनंद जीवनात!

कोणाला सत्संग तीत
कोणाला कुसंगतीत
कोणाला ध्येयात
कोणाला आळसात
आनंदच आनंद जीवनात

कोणाला ऐश्वर्यात
कोणाला समाधानात
कोणाला विश्रांतीत
कोणाला कर्तव्यात
आनंदच आनंद जीवनात!

आनंदाचे प्रकार न्यारे
मात्र सर्वांना ते खूप प्यारे
त्यासाठी नित्य झटती रे
आयुष्यभर मात्र सारे
व्यक्तिपरत्वे करा साजरे!

**सुखदा सयाजीराव गोरड**



## आनंद...!

जीवन सुंदर आहे
त्याचा आनंद घ्या,
जन्म एकदाच आहे
आनंद लुटून घ्या..!

आपसातले हेवेदावे
विसरून जा,
जीवन क्षणभंगुर आहे
आनंद लुटून घ्या...!

जीवन हा एक
सुंदर प्रवास आहे,
उद्याचा माहीत नाही
आनंद लुटून घ्या...!

आयुष्यात चांगली माणसं
जमवणं म्हणजे आनंद,
ती जमवून...
आनंद लुटून घ्या...!

सर्वांवर प्रेम करणं
अन् करून घेणं,
हाचि खरा आनंद
तोचि आनंद लुटून घ्या..!

**प्रा.के.एस.शिरबंदे,**
**दापोली**



# बाल जगत





## माझा आवडता खेळ: कबड्डी

मी लहानपणी अनेक खेळ खेळायचो. पण माझा सर्वात आवडता खेळ कबड्डी. आमच्या शाळेत आम्ही सर्वात जास्त कबड्डी हाच खेळ खेळतो. आम्हाला शाळेला सुट्टी असली की आम्ही एकत्र येऊन हाच खेळ खेळत असतो. या खेळाचे काही नियम असतात. मी कबड्डी या खेळात ऑलराऊंडर म्हणून खेळतो. जेव्हा आमच्या गावामध्ये कबड्डीचे सामने आयोजित केलेले असतात तेव्हा आम्ही उत्साहाने सामने पाहण्यासाठी जातो.

या खेळाचे काही नियम आहेत. हा खेळ दोन संघांमध्ये खेळला जातो. एका संघामध्ये सात खेळाडू असतात. हा खेळ खेळण्यासाठी वयाची अट नसते. लहान मुलांनपासून ते मोठ्यांनासुद्धा वेड लावणारा असा हा खेळ आहे. ह्या खेळामुळे आपल्या शरीराचा व्यायाम होतो . फक्त भारतातच नव्हे तर इतर देशातील खेळाडू हा खेळ खेळतात.

कबड्डी या खेळाचे पहिले नाव हुतुतू असे होते. मात्र आता हा खेळ गावोगावी खेळला जातो. आपल्या टि व्ही वर सुद्धा प्रो कबड्डी लागते. मी ती कबड्डी पाहून तसा खेळायला पाहतो. जेव्हा दोन्ही संघ चांगले खेळत असतील तेव्हा प्रेक्षकांना पहायला पण खूप मजा येते. कबड्डी खेळात ज्या संघाचे जास्त गुण तो संघ विजयी होतो. आम्ही जेव्हा कबड्डी खेळतो तेव्हा मी जास्त चढाई करतो व पॉईंट आणायचा प्रयत्न करतो. माझे मोठेपणी स्वप्न आहे की मी कबड्डीपटू बनुन आपल्या गावाच्या संघातून खेळेन व गावाचे नाव मोठे करेन.



**कु. प्रसाद शिगवण,**
**इयत्ता- सातवी.**



## संतुलित आहाराचे महत्त्व

आपल्या शरीराच्या योग्य वाढीसाठी आणि आपल्या शरीराला आवश्यक उर्जा मिळण्यासाठी नियमित आहार आवश्यक आहे. मात्र दररोजचा आहार हा केवळ अन्न म्हणून न खाता तो संतुलित कसा होईल हे पाहणेदेखील आवश्यक आहे. आपला दैनंदिन आहार जर संतुलित असेल तरच आपल्या शरीरास आवश्यक असणारे अन्नघटक, जीवनसत्त्वे, प्रथिने, स्निग्ध पदार्थ योग्य प्रमाणात मिळतील. आम्ही शाळेत अभ्यास करताना संतुलित आहाराचा पिरॅमीड अभ्यासला आहे. याशिवाय अनेक आहारतज्ज्ञांचे असेही म्हणणे आहे की, आपला दैनंदिन आहार हा रंगीबेरंगी असायला हवा. आपण पांढऱ्या रंगाचे पदार्थ कमीत कमी खायला हवेत. आपल्या आहारात मोड आलेली कडधान्ये, दूध, अंडी, पालेभाज्या, कोशिंबीर, कडधान्ये, फळे, मांस यांचा समावेश आलटून पालटून असायला हवा. दैनंदिन आहारातून आपल्या शरीरास आवश्यक असणारी जीवनसत्वे, प्रथिने, पिष्टमय व स्निग्ध घटक, लोह, कॅल्शियम सारखी खनिजे योग्य प्रमाणात मिळतील असा संतुलित आहार आपण नेहमी घेणे आवश्यक आहे.

लहान मुलांसाठी तर अशा संतुलित आहाराचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या वाढत्या वयात लहान मुलांना वर उल्लेख केलेले सर्व अन्नघटक मिळणे आवश्यक असते. कारण याच वयात त्यांच्या शरीराची वाढ व पोषण वेगाने होत असते. या वयात त्यांना असा चौरस किंवा संतुलित आहार मिळाला तर त्यांची शारीरिक आणि मानसिक वाढ योग्य प्रकारे होते असे विज्ञान सांगते. मात्र याच वयात लहान मुलांना असा संतुलित आहार मिळाला नाही तर त्यांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. त्यांच्या शरीराची वाढ योग्य गतीने व योग्य प्रमाणात होत नाही. त्यामुळेच पुढे कुपोषणासारख्या समस्यादेखील उद्भवू शकतात. लहान मुलांना बऱ्याच वेळेस बाजारातील खमंग व चमचमीत खाद्यपदार्थ खाण्यास आवडतात. मात्र बाजारातील अशा खमंग पदार्थांमध्ये आवश्यक अन्नघटक कमी आणि अनावश्यक किंवा आरोग्यास धोकादायक





अन्नघटक असलेले पदार्थ अधिक असतात. त्यामुळेच लहान मुलांना लठ्ठपणा सारखे गंभीर आजार उद्भवू शकतात. याशिवाय पोटाचे विविध आजारही निर्माण होऊ शकतात.

आपल्या लहान मुलांची योग्य वाढ होण्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना बाजारात उपलब्ध असलेल्या पदार्थांऐवजी घरगुती, चौरस किंवा संतुलित आहार कसा मिळेल याकडे लक्ष दिले पाहिजे. सध्याच्या काळात प्रत्येक पालकाने संतुलित आहाराचे महत्त्व जाणून आपल्या मुलांना असा संतुलित आहार दिला पाहिजे. खाण्याच्या बाबतीत मुलांचे अवाजवी लाड करता कामा नयेत. आपल्या देशाची भावी तरुण पिढी निरोगी, सशक्त व बलवान घडावी असे वाटत असेल तर संतुलित आहार हाच एकमेव उपाय आहे. त्यामुळेच संतुलित आहाराचे आपल्या दैनंदिन जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**कु. दीप शिगवण,**
**इयत्ता- सातवी.**



## माझा आवडता खेळ

माझा आवडता खेळ क्रिकेट आहे आणि हा खेळ जगात लोकप्रिय आहे. प्रत्येक वाडी मध्ये हा खेळ खेळला जातो. पवन कने, चेतन म्हात्रे, भावेश पवार, बंटी पटेल,हे सर्व खेळाडू मला आवडतात.

या खेळामध्ये बारा जण खेळायला असतात. या खेळाचे उद्दिष्टे आहेत की सर्वांना बॅटिंग करायला मिळते आणि मला बॅटिंग करायला आवडते. जेव्हा आम्ही मुले खेळत असलो की मी जास्त अथर्वची विकेट काढतो. आणि तो माझी विकेट काढायला पण येत नाही. मी त्याची विकेट काढाली की तो मला मारायला येतो. माझी बॅटिंग सर्वांना आवडते.

हा खेळ असा आहे की यामध्ये कोणालाही दूखपत होत नाही. जास्त करून सर्वजण हाच खेळ खेळतात. आता मुली पण क्रिकेट खेळतात. या खेळामध्ये जर आपण चांगली बॅटिंग केली तर त्याच सिलेक्शन होऊ शकते. जर आपलं सिलेक्शन झालं तर आपण दुसऱ्या टीम मधून खेळू शकतो आणि जर दुसऱ्याची कॅच पकडायची असेल तर अंगात चपळाई पाहिजे नाहीतर आपण कॅच पकडू शकत नाही.
मला हा खेळ खूप खूप आवडतो. माझं स्वप्न आहे की मी मोठा झाल्यावर आपल्या देशाच्या टीमधून खेळीन आणि हे स्वप्न पूर्ण करेन.......





**कु. विराज राजेंद्र मुलुख.**
**जि. प. शाळा चंद्रनगर**
**इयत्ता - सातवी**

## माझा आवडता खेळ

माझा आवडता खेळ कबड्डी आहे. कबड्डी हा खेळ प्राचीन काळापासून खेळला जातो. कबड्डी हा खेळ लोकप्रिय खेळ आहे. त्या खेळात एकुण सात खेळाडु असतात व 3-4 खेळाडू राखीव असतात. एखाद्या खेळाडूला काही झालं किंवा लागल तर राखीव खेळाडुला खेळवली जाते. कबड्डी खेळामध्ये एखादा खेळाडु रेड टाकायला गेला की त्याच्या कडे 30 सेकंद इतका वेळ असतो. जर तो 30 सेकंद मध्ये परत आपल्या टिम मधे आला नाही तर तो खेळाडु बाद करण्यात येतो. आणि समोरच्या टीम ला एक पॉइंट जातो. आपण रेड घालून जातो तेव्हा जर सात -सहा खेळाडु असतील तर बोनस पॉइंट दीला जातो. बोनस घेताना पाय लाईन वर आणि एक पाय हवेत असेल तर बोनस पॉइंट दिला जातो. आणि जर कोणत्याही खेळाडुला न पकडता रेडर लाबि मध्ये गेला तर तो बाद होतो.हा खेळ बघायला पण खूप लोक येतात. अनेक गावात शहरात कबड्डी स्पर्धा होतात.

**कु. इशांत पागडे,**
**इयत्ता- आठवी**



## माझा आवडता खेळ बॅडमिंटन

बॅडमिंटन हा माझा आवडता खेळ आहे. भारतात विविध प्रकारचे खेळ खेळले जातात. त्यापैकी एक आहे बॅडमिंटन. रॅकेट आणि फुल बॅडमिंटन साहित्याच्या मदतीने खेळला जातो. जगभरात हा खेळ लोकप्रिय आहे. हा खेळ अतिशय वेगवान खेळ आहे. बॅडमिंटन या खेळासाठी उत्तम शैलीची गरज असते. बॅडमिंटन खेळाचे सर्व साहित्य माझ्याकडे आहे. बॅडमिंटन खेळात सरावाची खूप गरज भासते. तसेच शरीर लवचिक बनवण्यासाठी विशिष्ट प्रकारचा व्यायाम करावा लागतो. बॅडमिंटन हा एक बंदिस्त मैदानात खेळला जाणारा खेळ आहे. बॅडमिंटनच्या मैदानाला कोर्ट असेही म्हणतात. हा खेळ महिला तसेच पुरूष दोघेही खेळू शकतात.

**कु. सांची मिसाळ,**
**इयत्ता- सातवी.**



